जि.प./ शि.वि.मा.,नागपूर
शिक्षणाधिकारी(माध्य.), जि.प.,नागपूर
जा.क्र.: 5817
दिनांकः 13/11/14

प्रति.,
मुख्याध्यापक
..........................................................
..........................................................

शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,नागपूर व शिक्षण विभाग नागपूर महानगरपालिका, नागपूर तसेच म.न.पा. शिक्षक संघ यांचे सहकार्याने महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणे मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ, महामंडळ संलग्न नागपूर जिल्हा कलाध्यापक संघ, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे भव्य प्रमाणात आयोजन करण्यांत येत आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कला विषयाला शासनातर्फे प्राधान्य देण्यांत आले आहे. नविन कल्पनेनुसार शालेय जीवनातच मुलांच्या सहज प्रवृत्तीचा विधायक विकास व्हावा. मुलांनी आत्मकेंद्रीत होवून त्यांच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलुंचे प्रगटीकरण करावे. नियमीत अभ्यास करत असतांनाच विद्यार्थी इतरही कलागुण संपन्न व्हावा. मुलांच्या कल्पकतेचा विकास व्हावा व सृजनशिलता वाढावी ह्या उद्देशाने आम्ही वर्ग १ ते ४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अतिशय सुलभ अपूर्ण रेखाटने दिली जाणार आहेत. त्यावर छापलेले अपूर्ण चित्र स्पर्धेसाठी देण्यात आलेल्या रंगाच्या सहाय्याने किंवा ईतर माध्यमातून रंगवता येईल. जेणे करुन मुले मनसोक्तपणे रंगाशी खेळून कलेचा आस्वाद घेतील. मनावर कसलेही दडपन न ठेवता रंगाची उधळण करतील. वर्ग ५ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना विषयानुरुप स्मरण चित्र रेखाटून रंगवायाचे आहे. याकरिता ड्रॉईंग पेपर विद्यार्थ्यांना पुरविण्यात येईल. स्वकल्पनेने चित्र जास्तीत जास्त आकर्षक पध्दतीने रेखाटून रंगवायाचे आहे. त्यामुळे कल्पकता व सृजनशिलता वृध्दिंगत होऊन कलेतून व्यक्तीविकासास सहकार्य करावे.

| | | |
|---|---|---|
| शिक्षणाधिकारी<br>नागपूर महानगरपालिका, नागपूर | शिक्षणाधिकारी (प्राथ.)<br>जिल्हा परिषद, नागपूर | शिक्षणाधिकारी (माध्य.)<br>जिल्हा परिषद, नागपूर |

महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ, महामंडळ संलग्न नागपूर जिल्हा कलाध्यापक, नागपूर
(शिक्षण विभाग) जि.प. नागपूर व (शिक्षण विभाग) म.न.पा. तसेच म.न.पा. शिक्षक संघ यांचे सहकार्याने

# रंगात रंग

जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा २०१४

**चित्रकला स्पर्धेचे नियम व अटीः**

स्पर्धा तीन गटात होईल.

रंगभरण स्पर्धा - गट अ- वर्ग १ ते ४ ( के.जी. १ व के.जी. २ समाविष्ठ केल्या जाईल.)
स्मरणचित्र स्पर्धा - गट ब - वर्ग ५ ते ७ गट क - वर्ग ८ ते १०

**रंगभरण स्पर्धा- ( वर्ग १ ते ४ )**

१) रंगभरण स्पर्धेत वर्ग १ ते ४ पर्यंत सहभागी सर्व स्पर्धकांना रु. १०/- किमतीचा कलर बॉक्स व चित्र काढण्यासाठी अपूर्ण चित्र रेखाटलेली ड्रॉईंग शिट आयोजकांकडून मिळेल.
२) रंगभरण स्पर्धा शुल्क रु. १५/- प्रत्येकी प्रमाणे राहील या शुल्कातून स्पर्धा संयोजन व प्रवास खर्चाकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांमागे २ रुपये कमी करुन उर्वरीत रक्कम १३ रुपये प्रमाणे स्पर्धा प्रमुखांकडे जमा करावी.
३) स्पर्धकांना दिलेले अपूर्ण चित्र पेन्सिलने पूर्ण करुन दिलेल्या रंगसाहित्याने किंवा इतर माध्यमातून पूर्ण करावे व दिलेल्या ठिकाणी स्पर्धकाचे पूर्ण नांव, शाळेचे नांव, वर्ग व संपर्क ( दुरध्वनी किंवा भ्रमनध्वनी ) क्रमांक लिहिणे अनिवार्य राहील.
४) रंगभरण स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकांना 'सहभाग प्रमाणपत्र' दिल्या जाईल.

**स्मरणचित्र स्पर्धा**- (वर्ग ५ ते १०)

१) चित्रकला स्पर्धेत वर्ग ५ ते १० पर्यंत सहभागी सर्व स्पर्धकांना चित्र काढण्यासाठी ड्रॉईंग शिट व रंगपेटी आयोजकाकडून मिळेल.

२) स्मरणचित्र स्पर्धा शुल्क रु.१५/- प्रत्येकी प्रमाणे राहील या शुल्कातून स्पर्धा संयोजन व प्रवास खर्चाकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांमागे २ रु. कमी करुन उर्वरीत रक्कम १३ रु. प्रमाणे स्पर्धा प्रमुखांकडे जमा करावी.

३) स्पर्धकांनी दिलेल्या विषयानुसार कोणत्याही एका विषयावर चित्र पेन्सिलने पूर्ण करुन रंगसाहित्याने किंवा इतर माध्यामातून पूर्ण करावे व कलाकृतीच्या पाठीमागे स्पर्धकाचे पूर्ण नांव, शाळेचे नांव, वर्ग व संपर्क (दुरध्वनी किंवा भ्रमणध्वनी ) क्रमांक लिहिणे अनिवार्य आहे.

**विषय**- ब गट( वर्ग ५ ते ७) : १) स्वच्छ भारत अभियान २) भारतीय उत्सव ३) 'स्कुल चले हम'
क गट( वर्ग ८ ते १०) : १) स्वच्छ भारत अभियान २) प्रदुषण मुक्त भारत ३) भारतीय खेळ

४) स्मरणचित्र स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकांना 'सहभाग प्रमाणपत्र' दिल्या जाईल.

- स्पर्धा शुल्क व विद्यार्थ्यांची गटवार संख्या दि. १७ नोव्हेंबर २०१४ ते १७ डिसेंबर २०१४ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ६.३० वाजेपर्यंत दिलेल्या ठिकाणी स्विकारल्या जातील व त्याच वेळी विद्यार्थी संख्येनुसार ड्रॉईंग शिट्स व रंगपेट्या दिल्या जाईल.
- कलाकृती शाळेत किंवा घरुन विद्यार्थ्यांच्या सवडीनुसार तयार करावी पण कलाकृती विद्यार्थ्यांनीच काढलेली असावी.
- स्पर्धा आटोपल्यावर विद्यार्थ्यांचे गटवार चित्रे दि. १८ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१४ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ६.३० वाजेपर्यंतत स्विकारण्यात येईल तेव्हाच तेव्हाच ' सहभागप्रमाणपत्र ' देण्यांत येईल. ( उशीरा येणाऱ्या कलाकृतींचा स्पर्धेत समावेश केला जाणार नाही.)
- चित्रांची निवड तज्ञांकडून करण्यात येईल. डिसेंबर महिन्यात स्पर्धेचा निकाल जाहीर केल्या जाईल व तो व्यक्तीशः सर्व शाळांना कळविला जाईल व विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार वितरीत करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी घ्यावयांच्या सर्व निर्णयांचे अधिकार संयोजकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**पुरस्कार**

१) स्पर्धेतील तीन गट मिळवून १०० प्रवेशिका असणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रथम, व्दितीय, तृतीय असे तीन पुरस्कार विजेता प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात येईल.

२) १०० पेक्षा जास्त कलाकृती पाठवणाऱ्या मुख्याध्यापकास' उपक्रमशील मुख्याध्यापक', कलाशिक्षकांस उपक्रमशील कलाशिक्षक' सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून सन्मानीत करण्यात येईल.

३) ३०० पेक्षा जास्त कलाकृती पाठवणाऱ्या मुख्याध्यापकास ' कलाप्रेमी ', कलाशिक्षकांस ' कलाश्री ' सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून सन्मानीत करण्यात येईल व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार.

४) ५०० पेक्षा जास्त कलाकृती पाठवणाऱ्या मुख्याध्यापकास ' कलाभुषण ', कलाशिक्षकांस कलातपस्वी ' सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून सन्मानीत करण्यात येईल व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार.

५) १००० पेक्षा जास्त कलाकृती पाठवणाऱ्या मुख्याध्यापकास ' कलागौरव ', कलाशिक्षकांस ' कलारत्न ' शाल श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून गौरविण्यात येईल व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार.

६) स्पर्धा साहित्य वितरणा संदर्भात संपर्कः श्री शिवराज महतपुरे मो.९७६४७४०६५, फोन नं. ०७१२- २७२५९२१ मो.९९२३१७२५१८,९९६०९७६५५७,९९२३७५१४१६ यांचेशी संपर्क करता येईल.

७) प्रवेश शुल्क व गटावर यादी तसेच ड्रॉईंग शीट व रंग मिळण्याचे व स्विकारण्याचे स्थळः
**नागपूर जिल्हा कलाध्यापक संघ, नागपूर,कार्यालय**
म.न.पा. शिक्षक संघ, अध्यापक भवन, अध्यापक मार्ग, नविन बस स्थानकासमोर, नागपूर-४४००१८

आयोजक
नागपूर जिल्हा कलाध्यापक संघ, नागपूर

| नरेंद्र बारई | दीपक गायकवाड | संजय चिंचखेडे | मुरलीधर कोहाडे | रवि खंडाईत | शेखर वानस्कर | राहुल जोहरे | सुभाष सुने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष(ग्रामिण) | अध्यक्ष (शहर) | कोषाध्यक्ष | सहसचिव | सहकोषाध्यक्ष |

सभासदः नरेन्द्र मन्ने, विकास ढोबळे, नितिन राळे, श्रीकांत गडकरी, कंचन प्रजापती, प्रेमदास गुळघाणे, राहुल चौधरी संजय पळसकर, चक्रधर फसाटे, सौ. कमल घोडमारे, योगेश बाराहाते, प्रकाश जिल्हारे, अतुल दोनोडे, वर्षा भुजाडे, प्रगती सरोदे
महिला प्रतिनिधीः लक्ष्मी मेहर, रोहिणी देशमुख, सीमा चौधरी.
स्पर्धा संयोजकः शिवराज महतपुरे, पराग दोमाडे, किशोर सोनटक्के, चंद्रमणी मून, प्रकाश जिल्हारे, श्याम पानतावणे, प्रफुल चरडे

शैक्षणिक महत्वाचे

बुक-पोष्ट

प्रति,
मा. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका

प्रेषक
दीपक गायकवाड
सचिव
नागपूर जिल्हा कलाध्यापक संघ, नागपूर
मो. ९९६०९७६५५७